अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार, दि.२ जानेवारी २०२४ | वर्ष : २२ वे | अंक : ८४ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## जीएसटीचे विक्रमी संकलन; ९ महिन्यात १५ लाख कोटींचा कर जमा




**सोलापूर** : देशात जीएसटी संकलनात पुन्हा एकदा वाढ झाली आहे. अर्थ मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, एप्रिल ते डिसेंबर २०२३ दरम्यान जीएसटी संकलन १२ टक्क्यांनी वाढले असून १४.९७ लाख कोटी रुपये इतके झाले आहे. आकडेवारीनुसार, डिसेंबर २०२३ मध्ये जीएसटी संकलन वार्षिक आधारावर १० टक्क्यांनी वाढून १.६५ लाख कोटी रुपये झाले. डिसेंबरमध्ये सलग दहाव्या महिन्यात जीएसटी संकलनात वाढ झाली आहे. २०२३ मधील १० महिन्यांसाठी जीएसटी संकलनाचा आकडा १.५ लाख कोटी रुपयांचा आकडा पार केला आहे.

अर्थ मंत्रालयाने नवीन वर्षात जीएसटीची (वस्तू आणि सेवा कर) आकडेवारी जाहीर केली आहे. अर्थ मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, नोव्हेंबर २०२३ मध्ये जीएसटी संकलन १.६८ लाख कोटी रुपये होते. डिसेंबरमध्ये हा आकडा १.६५ लाख कोटी रुपये होता. जो मासिक आधारावर सुमारे दोन टक्के कमी आहे. गेल्या आर्थिक वर्षाच्या पहिल्या ९ महिन्यांत जीएसटी संकलनाचे आकडे सातत्याने वाढत आहेत. अर्थ मंत्रालयाच्या ताज्या आकडेवारीनुसार, जीएसटी संकलनाची मासिक सरासरी १.६६ लाख कोटी रुपये आहे.

# दबावतंत्र, बॅनरबाजी करणाऱ्यांना उमेदवारी मिळणार नाही

## देवेंद्र फडणवीसांनी इच्छुक उमेदवारांना भरला दम

**सुराज्य/मुंबई**

**आगामी लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने तयारी सुरू केली असून उमेदवारीसाठी कोणीही पक्षाला गृहीत धरू नये. निवडून येण्याची क्षमता व अन्य बाबी पाहून उमेदवारीबाबत संसदीय मंडळाकडून निर्णय घेतला जाणार आहे. त्यामुळे जर कोणी बॅनरबाजी किंवा अन्य माध्यमातून दबाव आणत असेल तर अशा मंडळींना उमेदवारी मिळणार नाही, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. त्यामुळे पक्ष शिस्त मोडू पाहणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.**

पाच राज्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपने प्रस्थापित नेत्यांना जोरदार धक्का दिला. मध्य प्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये झालेल्या निवडणुकांमध्ये शिवराजसिंह चौहान, वसुंधराराजे यांच्यासह मातब्बर नेत्यांना मुख्यमंत्रिपदाची संधी न देता नवीन चेहऱ्यांची निवड केली. त्याच प्रकारचे धोरण येत्या काळात होणाऱ्या महाराष्ट्रातील लोकसभा निवडणुकीतही राबवले जाणार असल्याचे भाजपकडून स्पष्ट करण्यात आले. भाजप प्रदेश कार्यकारिणीची बैठक नुकतीच झाली. या बैठकीस उपस्थित असलेल्या सदस्यांना संबोधित करताना देवेंद्र फडणवीस यांनी सूचना दिल्या. लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवार निवडताना भाजपकडून प्रस्थापितांसाठी धक्कातंत्र वापरले जमणार आहे. त्याशिवाय उमेदवारीसाठी इच्छूक असलेल्यांनी कोणताही दबावतंत्र अथवा मतदारसंघात बॅनरबाजी केल्यास त्यांचा विचार केला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा फडणवीस यांनी दिला आहे.

### कार्यकर्त्यांना दिला कानमंत्र

कार्यकर्त्यांना सूचना देत त्यांनी कानमंत्र दिला. येत्या काळात विजयाबद्दल आत्मसंतुष्ट होऊ नका आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुका गांभीर्याने घ्या, असा सल्ला त्यांनी दिला. लोकसभा निवडणुकीत भाजपचा विजय निश्चित आहे, असे समजून मैदानात उतरून काम करणे थांबवू नका, असाही इशारा त्यांनी दिला आहे. या बैठकीत देवेंद्र फडणवीस यांनी कार्यकर्त्यांना सामान्यांपर्यंत पोहोचण्याचा सल्ला दिला आहे. भाजपची व्होटबँक असलेल्या सर्वसामान्य आणि गरिबांशी त्यांनी जोडले पाहिजे.



### महायुती-महाविकास आघाडीतील इच्छुकांचा जीव टांगणीला...

महाविकास आघाडीच्या जागावाटपाची चर्चा सध्या सुरू आहे. जागा वाटपाबाबत रोज नवनवीन दावे करण्यात येत आहेत. कोणाला किती व कोणत्या जागा मिळतील याबाबत तर्क लढवले जात आहेत. हीच परिस्थिती महायुतीतील तीनही पक्षांचीही झाली आहे. या जागा वाटपाच्या घोळामुळे निवडणूकीची तयारी करणाऱ्या इच्छूक उमेदवारांची घालमेल मात्र वाढली आहे. हिंगोली लोकसभा मतदारसंघातील इच्छूकांचा जीव सध्या टांगणीला लागला आहे. महाविकास आघाडीच्या घटक पक्षातील शिवसेना ठाकरे गटाने दावा मतदारसंघावर दावा केला.

### महाआघाडीचा जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित

आगामी लोकसभा निवडणुकीबाबत राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. महाविकास आघाडीचा जागावाटपाचा फॉर्म्युला निश्चित झाला आहे. याची प्राथमिक फेरी मातोश्रीवर झाली असल्याची माहिती जयंत पाटील यांनी दिली. सोमवारी इस्लामपूर येथे राम मंदिर अक्षता कलशपूजन पार पडले. यावेळी ते बोलत होते. प्रत्येक जण निवडणूक जिंकण्यासाठीच प्रयत्न करीत असतो. महाराष्ट्रातील लोक आमची भूमिका मान्य करतील, अशी आशा आहे. चांगलं राज्य चालविण्यासाठी जनता आम्हाला आशीर्वाद देईल, असं मत जयंत पाटील यांनी व्यक्त केलं. तसेच माझा आणि संजय शिरसाट यांचा कधीही संवाद झाला नाही, मग त्यांना माझ्या मनातलं कसं कळणार, त्यांचा बोलण्याचा उद्देश मला माहीत नाही, असा टोला जयंत पाटलांनी लगावला.

### भाजपची निवडणूक कार्यालये सुरू होणार

लोकसभा निवडणुकीची तयारी करीत असताना भाजप कार्यकर्त्यांनी २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुका हलक्यात घेण्याची गरज नाही, असा सल्ला फडणवीस यांनी भाजप कार्यकर्त्यांना दिला आहे. येत्या काळात उमेदवार जाहीर होण्याची वाट न बघता ३१ जानेवारीपर्यंत लोकसभा तर १४ फेब्रुवारीपर्यंत विधानसभानिहाय भाजपची निवडणूक कार्यालये सुरू करण्याचे आदेश सहराष्ट्रीय सरचिटणीस शिवप्रकाश यांनी बैठकीत दिले.

## नवीन वाहन कायदा रद्द करा; यावलीत ट्रक चालकांचा चक्काजाम





**सुराज्य/सोलापूर**

केंद्र सरकारने आणलेल्या नवीन वाहन कायदा रद्द करण्याच्या मागणीसाठी सोमवारी सोलापूर -पुणे हायवे रोडवरील मोहोळ तालुक्यातील यावली हद्दीतील दिग्विजय पेट्रोल पंपासमोर अचानक ट्रक चालकांनी रस्ता रोखून धरल्याने काही काळ वाहतूक ठप्प झाली होती.

सात लाख रुपये दंडही आकाराला जाणार आहे. याच कायद्याला देशभरात विरोध होत असून, महामार्गावरील ट्रक चालकांनी संपाची हाक दिली. हा नवीन कायदा रद्द करा, यासंदर्भात ट्रकचालकाने सांगितले की, चालकांना दहा हजार पगार असतो. त्यामध्ये त्यांचे पोट चालत नाही. चालक हा काही मुद्दाम अपघात करत नाही. नैसर्गिकरीत्या अपघात होत असतात. पण, अपघात झाल्यानंतर दहा वर्षं कारावास आणि पाच लाख दंड करण्याचा हा कायदा अन्यायी आहे. तो रद्द करावा या मागणीसाठी संतापलेल्या ट्रक चालकांनी सोमवारी अचानक सोलापूर पुणे महामार्गावर रस्ता अडवून धरला. काही काळ वाहतूक ठप्प झाल्याने मोठी तारांबळ उडाली होती. कायदा रद्द झाला नाही, तर तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा देखील देत परराज्यातील ट्रक चालकांनी घोषणा बाजी करत सरकारचा निषेध व्यक्त केला. यावेळी पोलीस यंत्रणा दाखल होताच रस्ता सुरळीत करण्यात आला.

## विहिरीत पडलेल्या ९ वर्षाच्या यशराजचा मृतदेह मिळाला

**मोहोळ** : खेळताना ८० फूट खोल विहिरींत पडलेल्या ९ वर्षाच्या मुलाचा दुसऱ्या दिवशी मृतदेह मिळाला. पाटकूल येथे ही घटना घडली होती. यशराज दत्तात्रय कसबे असे मृत मुलाचे नाव आहे.

खरसोळी येथील दत्तात्रय सदाशिव कसबे हे मोहोळ तालुक्यातील पाटकुल येथे पत्नी, तीन मुली व मुलगा यशराज यांच्यासह राहत होते. मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत होते. दि. ३० डिसेंबर रोजी दत्तात्रय कसबे हे कामानिमित्त बाहेर गेले होते. त्यांना दुपारी दोन वाजण्याच्या दरम्यान त्यांच्या नातेवाईकांनी फोन करून सांगितले की, यशराज हा खेळायला गेल्यानंतर कुठेतरी विहिरींत पडला आहे. त्यानंतर दत्तात्रय हे तत्काळ पाटकुल येथे गेले. पाटकुल गावात असलेल्या दिलीप भगवान काळे यांच्या विहिरींजवळ लोक जमलेले दिसले. त्यावेळी त्यांची खात्री झाली की, मुलगा यशराज हा त्याच विहिरींत बुडाला आहे. २४ तासानंतर पाणी कमी झाल्यानंतर दोघांनी सायंकाळी मृतदेह बाहेर काढला.

## माढा कोर्टाकडे निघालेल्या तरुण वकिलाचा अपघाती मृत्यू

**सुराज्य/कुर्डूवाडी**

माढा कोर्टात निघालेल्या वकिलाचा कुर्डूवाडी-माढा रस्त्यावर भोसरे हद्दीत दोन दुचाकींच्या झालेल्या धडकेत मृत्यू झाला. सोमवार दि. १ रोजी दु. १२.३० वा. ही घटना घडली.



अरुण परमेश्वर बोडरे (वय ४१ रा.बादलेवाडी ता.माढा) असे मयत वकिलाचे नाव आहे. ॲड. बोडरे हे त्यांची दुचाकी एम एच ४५ ए व्ही ८०१२ वरून बादलेवाडी येथून कुर्डुवाडीमार्गे माढा कोर्टाकडे जात होते. कुर्डूवाडी - माढा रोडवर भोसरे हद्दीत बुलेट क्रमांक एम एच ४५ ए एस १७७७ शी झालेल्या धडकेत अरुण बोडरे यांचा उपचारापूर्वी मृत्यू झाला. घटनास्थळावर रस्त्याच्या बाजूला हेल्मेट पडलेले होते. एका गाडीचा बंपर तुटलेला होता. ॲड.बोडरे यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, दोन भाऊ असा परिवार आहे. त्यांच्या निधनाची बातमी समजतात कुर्डूवाडी ग्रामीण रुग्णालयात तालुक्यातील वकील, मित्र व नातेवाईकांनी गर्दी केली होती.

### पक्षकारावर संकट नशिबाने टळले

ॲड.बोडरे व त्यांचे पक्षकार एकत्र मोटरसायकलवर जाण्यासाठी निघाले होते. मात्र पक्षकारांना काही कागदपत्रे घेण्यासाठी कुर्डूवाडीला थांबावे लागले होते. यानंतर पुढे भोसरी हद्दीत वकिलांचा अपघात झाल्याचे समजतात पक्षकाराला धक्का बसला.

## राज्यात कोरोनाचे ७० नवे रुग्ण; ७४३ सक्रीय रुग्ण



**मुंबई** : नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी राज्यात ७० नव्या कोरोना रुग्णांची निदान झालं आहे. त्यामुळे राज्यात सध्या सक्रिया रुग्णांची संख्या ही ७४३ इतकी झालीये. तसेच सर्वाधिक सक्रिय रुग्ण हे एकट्या ठाणे जिल्ह्यात आहेत. त्यापाठोपाठ मुंबई जिल्ह्यात १३० सक्रीय रुग्ण असून पुण्यात १२४ सक्रीय रुग्ण सध्या उपचार घेतायत. नव्या आलेल्या जेएन.१ या व्हेरियंटचे १५ रुग्ण एकट्या पुण्यात आढळून आलेत.

सोमवार १ जानेवारी रोजी ३२ रुग्णांना घरी सोडण्यात आले. तसेच राज्याचा रुग्ण बरे होण्याचा दर हा ९८.१% टक्क्यांवर पोहचलाय. मागील अनेक दिवसांपासून कोविडच्या रुग्णसंख्येत वाढ होत असल्याचं चित्र पाहायला मिळतंय. तसेच नव्या आलेल्या गछ.१ या व्हेरियंटमुळे पुन्हा एकदा धास्ती वाढवली आहे. त्यामुळे केंद्र सरकारकडून राज्यांना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## लग्न मोडण्याच्या कारणावरून हाणामारी

### पाच महिलांसह १७ जणांवर गुन्हा

**सोलापूर** : मुलीचे लग्न मोडल्याच्या कारणावरून बेलदार आणि पाटील यांच्या गटात हात पाय बांधून लोखंडी गज, दगड, काठी आणि लाथाबुक्याने झालेल्या मारहाणीत ६ जण जखमी झाले. ही घटना पेहे (ता.पंढरपूर ) येथे रविवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणात करकंबच्या पोलिसांनी परस्परविरोधी फिर्याद नोंदवून दोन्ही गटातील १७ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

यासंदर्भात गजानन गोरख पाटील (वय ३२ रा. पेहे ) याने पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी शेखर बेलदार, उज्वला बेलदार, विशाल बेलदार, माऊली बेलदार, अश्विनी बेलदार, संतोष बेलदार, स्वाती बेलदार, आणि सीताबाई बेलदार (सर्व रा.पेहे ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. बेलदार यांच्या मुलींचे लग्न मोडल्याच्या गैरसमज करून वरील आरोपींनी लोखंडी रॉड, आणि दगडाने मारहाण केली. गजराज पाटील, त्याचा चुलत भाऊ सचिन दोघांचे हातपाय बांधून त्यांना घरात डांबून ठेवून मारहाण केली. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. शेखर नामदेव बेलदार (वय ४४ ) याने दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी गजराज पाटील, सचिन पाटील, पिंटू पाटील, सुहास पाटील, अनिल पाटील, शिवाजी पाटील, गोरख पाटील, सोनू पाटील आणि गिरिजा पाटील हे अशा ९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



संकल्प वाचता वाचता नववर्ष संपून जाईल !

कल्याण
446-41-560
मुंबई
170-81-137

## पाटील, खरटमलांची अजित पवारांसमवेत गुफ्तगू

**सुराज्य/सोलापूर**

**राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांची सोलापूर शहरातील दोन दिग्गज नेते माजी आमदार रविकांत पाटील आणि काँग्रेसचे माजी अध्यक्ष सध्याचे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जेष्ठ नेते सुधीर खरटमल यांनी पुण्यात भेट घेऊन चर्चा केल्याने सोलापूर शहरात चर्चाला उधान आले आहे.**

या भेटींत उपमुख्यमंत्र्यां समवेत सोलापूर शहरातील विविध विकास कामाविषयी अजित पवार यांनी या दोघांशी प्रदीर्घ चर्चा केल्याचे समजते. वास्तविक पाहता रविकांत पाटील इंडीचे आमदार आहेत. त्यांचा सोलापुरात मोठा दबदबा आहे. पाटील हे सोलापूरच्या राजाकारणातून बराच काळ दूर होते. आता राष्ट्रवादीच्या नेत्यांच्या माध्यमातून अजित पवार यांची भेट घेतल्याने पाटील राष्ट्रवादीत प्रवेश करण्याची शक्यता बोलली जात आहे.

शहरातील लिंगायत भवन याच्या निधी संदर्भात तसेच पाण्याची दुहेरी लाईन, महात्मा बसवेश्वर स्मारक असे अनेक विषय सुधीर खरटमल आणि रविकांत पाटील यांनी अजित पवार यांच्या समोर सविस्तर



मांडणी केली त्यावर अजित पवार यांनी सांगितले आपण सांगाल ते कामे मार्गी लावून देतो असे आश्वासन पवार यांनी दिली असल्याचे सांगितले.

खरटमल यांनी लिंगायत भवनसाठी आपण जो ७० लाखाचा निधी मंजूर केला होता त्यासाठी आपले धन्यवाद मानले उद्घाटन माजी पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या शुभहस्ते करण्यात आले होते. त्यांनी १ कोटी अधिकचा निधी जिल्हा नियोजन मधून लिंगायत भवन साठी मंजूर केला होता मधील काळात सत्तांतर झाल्यानंतर तो निधी उपलब्ध होऊ शकला नाही त्यामुळेच आपण अधिकचा निधी उपलब्ध करून द्यावे अशी मागणी यावेळी केली. पवारांनी याला सकारात्मक प्रतिसाद दिला तुमचे प्रत्येक काम मार्गी लावले जाईल सुधीरजी असे म्हणत मुंबईला परत भेटायला येण्याचे निमंत्रण दिले. माजी आमदार रविकांत पाटील यांनी महात्मा बसवेश्वर स्मारकाच्या जमीन अधिग्रहण संदर्भात विषय उपस्थित केला. त्यावर अजित पवार यांनी महात्मा बसवेश्वर स्मारक तसेच सोलापूर शहरातील दुहेरीत पाण्याची पाईपलाईन यासंदर्भात लवकरच मंत्रालय स्तरावर बैठक घेऊ त्याकरिता रविकांत आणि सुधीर आपणास निमंत्रण असेल त्यावेळी हे सर्व प्रश्न मार्गी लावू असे आश्वासन दिले. याप्रसंगी प्रदेश प्रवक्ते उमेश पाटील शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार कार्याध्यक्ष जुबेर बागवान प्रदेश सरचिटणीस लतीफ तांबोळी अनिल उकरंडे आदी उपस्थित होते.